# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 30/04/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत खापरखेडा वार्ड क्र. 4, इंदिरा नगर येथे दि. 28/04/2021 चे 20.00 ते 06.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनिष विजय राउत, वय 32 वर्षे, रा, खापरखेडा, वार्ड क्र. 4 इंदिरा नगर यांचे किराणा दुकानाचे अज्ञात आरोपीने लॉक तोडून आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने दुकानातील किराणा सामान तूळ दाळ 10 किलो, 20 किलो साखर, निरमा बॅग, सिगरेट पॉकीटे, वेट ग्रेन्डर मशीन, 02 नग व चारमिनार कंपनीचे सुपारी पॅकेट 16 नग व इतर किराणा सामान व गल्ल्यातील चिल्लर 2,000/–रू. असा एकुण कि. 29,000/–रू. चा मुद्दमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार शरद डोंगरे 9764401246 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 16 कि. मी. अंतरावरील डोंगरगाव शिवार येथे दिनांक 28/04/2021 चे 18:30 वा. दरम्यान एमएच– 31/ईयु– 0237 क्रमांकाच्या ओमनी कारचा चालक आरोपी नामे– जयपाल मानीकराव शिवनकर, रा. पारडी नागपुर याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन समोर जाणाऱ्या अज्ञात वाहनाला ओव्हर टेक करण्याचा चक्कर मध्ये कार चालकाचा कार वरील नियंत्रण सुटल्याने कार रोडच्या डाव्या साईडला नाली मध्ये जावुन उलटली. त्यामुळे कार चालक आरोपी हा किरकोळ जखमी झाला. परंतु त्याचे जवळ बसलेला इसम मिलन गोविंदराव मेहर, वय 40 वर्ष, रा. नागपुर हा जागीच मरण पावला व कारच्या मागील सिटवर बसलेला इसम गोलु ठाकरे, रा. नागपुर यास डोक्याला उजव्या हाताला गंभीर मार लागला. तसेच कारचे तुटफुट होवुन नुकसान होण्यास आरोपी कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी पोलिस शिपाई अमित पवार पो.स्टे. कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ), 427 भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री भारत थिटे मो. क्र. 9623857068 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील शिरपुर रामटेक तुमसर रोड येथे दिनांक 29/04/2021 चे 17:00 वा. ते 17.30 वा. दरम्यान संजय रामचंद्र चौरसीया(मृतक), वय 50 वर्ष, रा. कामठी हा रामटेक वरून अरोली कडे एमएच– 40/बीएन– 9616 क्रमांकाच्या मोटरारसकलनी जात असतांना समोरून येणा–या अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून धडक दिली. या अपघातात मोटसायकल स्वार संजय रामचंद्र चौरसीया याचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मनोज रामचंद्र चौरीसीया, वय 54 वर्ष, रा. कामठी, पो.स्टे. रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री प्रमोद राउत मो. क्र. 9881683184 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर